# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail – ropune@dtemaharashtra.gov.in**


जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१९/ 9066 दिनांक : 07 DEC 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था

विषय – उजळणीवर्ग प्रशिक्षणासाठी नामनिर्देशने पाठविणेबाबत ...

संदर्भ – .मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे परिपत्रक क्र. १७/तंशिसं/यशदा प्रशिक्षण/२०१९/४०५ दिनांक ०३/१२/२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. दिनांक ३०/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० व दिनांक ०६/०१/२०२० ते १०/०१/२०२० या कालावधीत यशदा पुणे येथे आयोजित करण्यात येणा-या अध्यापकांच्या उजळणीवर्ग प्रशिक्षणासाठी संदर्भिय पत्रातील नमूद सुचनेनुसार आपल्या संस्थेतील पात्र अध्यापकांपैकी एकूण ०५ अध्यापकांची नावे खालील प्रपत्रांमध्ये भरुन संचालनालयांस desk17@dtemaharashtra.gov.in व या कार्यालयांस est.ropune@gmail.com या ईमेलवर दिनांक २०/१२/२०१९ पर्यंत न चुकता पाठवावी .

सदर माहिती Microsoft Excel-DV-TTNatraj Font मध्ये तयार करावी.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव व पदनाम | संस्थेचे नांव | नियुक्तीचा दिनांक | मोबाईल नंबर | दि.३०/१२/२०१९ ते ०३/०१/२०२० | दि.०६/०१/२०२० ते १०/०१/२०२० |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

३,महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२, २२६९०००७
E-mail : desk17@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १७/तंशिसं/यशदा प्रशिक्षण/२०१९/४०५
दिनांक : 03 DEC 2019

संदर्भ :- १) शासन नि.क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११
२) यशदा, पुणे यांचे पत्र क्र.CHD/2019-20/Ref-HTED/30 व 31 , दि.०२.१२.२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार या कार्यालयातील गट अ व गट ब मधील सर्व अधिकाऱ्यांना शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतन संस्थांतील वर्ग-अ व वर्ग-ब मधील शिक्षकीय/प्रशासकीय अधिकाऱ्यांचे राज्य प्रशिक्षण धोरणा अंतर्गत पायाभूत प्रशिक्षण(Foundation Course) व उजळणी वर्ग (Refresher course) होणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये यशदा, पुणे यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ ते ०३ जानेवारी, २०२० व दिनांक ०६ ते १० जानेवारी, २०२० या कालावधीत २ उजळणीवर्ग प्रशिक्षण (Refresher course) कार्यक्रम आयोजित केले असून, सदर दोन्ही प्रशिक्षणासाठी वर्ग-अ मधील एकूण ६० शिक्षकीय अधिकाऱ्यांची नावे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

तथापि संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना सूचित करण्यात येते की, आपले विभागातंर्गत येत असलेल्या सर्व संस्था/कार्यालयातील वर्ग-अ मधील ज्या शिक्षकीय अधिकाऱ्यांची शासन सेवेत किमान ७ ते १४ वर्षे सेवा पुर्ण झाली असेल आणि ज्यांचे वय ५५ वर्षा पेक्षा जास्त नसेल अशाच व संदर्भाधिन क्र.१ वरील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.३ मधील बाब क्र.(क) मध्ये नमूद केल्यानुसार ज्यांचे सदर कालावधीत दुसरे कोणतेही प्रशिक्षण झाले नाही (उदा.यशदा, पुणे यांचे मार्फत आयोजित पायाभूत प्रशिक्षण) त्याच शिक्षकीय अधिकाऱ्यांची नावे सदर उजळणीवर्ग प्रशिक्षणासाठी (Refresher course) खाली दिलेल्या विवरणपत्र नमुन्यात संचालनालयास उपलबध करुन दयावीत.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | संस्थेचे नाव | नियुक्तीचा दिनांक | मोबाईल क्रमांक | दि. ३० डिसेंबर, २०१९ ते ०३ जानेवारी, २०२० | दि. ०६ ते १० जानेवारी, २०२० |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

सदर माहिती दि.२०.१२.२०१९ पुर्वी Soft copy (Excel Sheet) मध्ये desk17@dtemaharashtra.gov.in या E-mail Address वर पाठविण्यात यावी. तसेच सदर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आल्यानंतर जे अधिकारी प्रशिक्षणास उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्याकडून प्रशिक्षणासाठी करण्यात आलेल्या खर्चाची वसूली करण्यांत येईल. जे संस्थाप्रमुख प्रशिक्षणासाठी अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणार नाहीत त्यांना त्यासाठी व्यक्तिश: जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही शासनाकडे प्रस्तावित केली जाईल. तसेच सदर प्रशिक्षणासाठी जे अधिकारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यांत येईल व याबाबतची नोंद संबंधितांच्या गोपनीय अहवाल घेण्यात येईल याची जाणीव संबंधितांना करुन देण्यांत यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
05 DEC 2019
आवक क्र. 12040

( डॉ.सुरेश मावलकर )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव..

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना सूचित करण्यात येते की, परिपत्रकात नमूद केल्यानुसार आपल्या विभागातंर्गत संस्थांना तात्काळ याबाबत सूचना देण्यात यावी. (सोबत यशदा, पुणे यांचे संदर्भाधिन क्र.२ वरील पत्रांची प्रत जोडली आहे.)